विस्तार परिपत्रक - १/२०१४

# किफायतशीर शेळीपालनासाठी
## उत्तम जात
# कोकण कन्याळ



डॉ. आनंद हणमंते
डॉ. प्रमोद मांडवकर
डॉ. मनोज तलाठी
श्री. प्रमोद यलमार

**कृषि विज्ञान केंद्र, किल्ला - रोहा**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ

दापोली - ४१५ ७१२, जि. रत्नागिरी

# किफायतशीर शेळीपालनासाठी उत्तम जात - कोकण कन्याळ

भारतीय कृषि अर्थ व्यवस्थेचा पशुधन हा एक अविभाज्य घटक असून ग्रामिण अर्थ व्यवस्थेमध्ये पशुधनास महत्वाचे स्थान आहे. ज्यापासून मांस व दुग्ध हे अन्नघटक पोषणासाठी आणि लोकर, कातडी इ. उपघटक प्राप्त होतात.

भारतातील ग्रामिण जीवनाशी शेळ्यांमेंढ्याचा निगडीत संबंध आहे. शेळ्या मेंढ्या ज्यांना रवंथ करणारे छोटे प्राणी संबोधले जाते ते ग्रामिण अर्थव्यवस्थेत विशेषत: लहान व अती लहान शेतकरी व भूमिहीन कुटुंबासाठी फार महत्वाच्या आहेत. आज आपल्याकडे शेती व्यवसायाशी निगडीत अनेक जोडधंदे आहेत त्यामध्ये शेळीपालन हा व्यवसाय भरारी घेऊ पाहत आहे.ह्या व्यवसायाला दिवसेंदिवस महत्व प्राप्त होत असून त्याकडे तरुण आकर्षिले जात आहेत. अनेक बडे भांडवलदार खाजगी संस्था या व्यवसायाकडे वळताना दिसत आहेत. शेळी पालनात रोज नवनवीन संकल्पना, जाती, व्यवस्थापनाच्या पध्दती अभयासल्या जात आहे. शेळीपालन व्यवसाय कमी खर्चाचा, कमी श्रमाचा, कमी जागा लागणारा, कमी धोक्याचा आणि जास्तीत जास्त फायदेशीर कसा होईल याकडे शेळीपालक लक्ष केंद्रीत करीत आहेत. अनेकांना भांडवलाअभावी गाय, म्हैस घेणे शक्य होत नाही. परंतु सध्याच्या काळात चांगल्या गाईची किंमत २५ ते ५० हजार तर म्हैशीची किंमत ३० ते ४० हजार रुपये एवढी आहे. पण चांगली शेळी २५०० ते ३००० रुपयात मिळू शकते, शिवाय गाई-म्हैशीच्या तुलनेत शेळीला जागा कमी लागते. तसेच चारा खाद्य कमी लागते, घरातील लहान मुले, स्त्रिया, वृध्द फावल्या वेळात शेळ्यांची चांगल्या प्रकारे देखभाल करु शकतात.

रवंथ करणाऱ्या सर्व पाळीव प्राण्यांमध्ये शेळी ही वेतामागे जास्त पिल्ले देणारी म्हणून प्रसिध्द आहे, उष्ण हवामानात तग धरण्याची त्यांची असाधारण सहनशक्ती व निकृष्ट दर्जाच्या खाद्य पदार्थांवर व चाऱ्यावर जगण्याची त्यांची क्षमता यामुळे शेळ्या अतिशय प्रतिकूल वातावरणात व भागात पाळल्या जाऊ शकतात.

जगात ५८ कोटी शेळ्या आहेत. त्यापैकी १८ कोटी शेळ्या ह्या एकट्या भारतात आहेत म्हणजेच जगाच्या २० टक्के शेळ्या भारतात आहेत. जगातील १०२ जातीच्या शेळ्यापैकी २२ जातीच्या शेळ्या भारतात आहेत, महाराष्ट्रात जवळजवळ ९.१९ दशलक्ष शेळ्या आहेत, महाराष्ट्रात शेळीपालन व्यवसाय हा मुख्यत्वे मांसोत्पादनासाठीच केला जातो. देशात असणाऱ्या एकूण जातीपैकी ठराविक जातीच्याच शेळ्याची निपज महाराष्ट्रात केली जाते. उदा. सुरती, बीटल, जमनापुरी, उस्मानाबादी, संगमनेरी, सिरोही इ. त्याचबरोबर सानेन, बोअर या विदेशी जातीच्या शेळ्या सांभाळल्या जात आहेत.

महाराष्ट्रामध्ये कोकणासारख्या डोंगरदऱ्याच्या प्रदेशात आणि उष्ण दमट हवामानात तग धरणारी काटक मजबूत पाय, टणक व उंच खुर असलेली अधिक उत्पादन क्षमता असलेली कोकण कन्याळ ही सुधारीत शेळी जात डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीने विकसित केली असून मांस उत्पादनासाठी प्रसिध्द असलेल्या या शेळीचे मटण उत्तम स्वादिष्ट व रुचकर आहे. ही जात मोकाट व बंदीस्त अशा दोन्ही पध्दतीने वाढविणेस योग्य असून कोकणातील सिंधुदूर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे या जिल्ह्यात या शेळीची पैदास प्रामुख्याने आढळून येत आहे.

## कोकण कन्याळ शेळीची वैशिष्ट्ये :-

### बाह्य शरीर गुणधर्म :-

रंग - शरीराचा वरचा भाग तोंडापासून ते शेपटांपर्यंतचा भाग काळ्या रंगाचा असून पोटाकडील खालचा भाग पांढरट रंगाचा आहे, चेहरा आणि कानावर पांढरी किनार आहे.

कान - लांब असून लोंबकळणारे आहेत.

शिंगे – गोल टोकदार मागे वळलेली
मान – लांब
शरीरयष्टी – तोंडापासून शेपटीपर्यंत शरीराचा जास्त लांबपणा व भरदार छाती
खांद्यापर्यंत उंची – नर ८४ सेमी, मादी ७४ सेमी
छातीचा घेर – नर ८३ सेमी, मादी ७३ सेमी
शरीराची लांबी – नर ८१ सेमी, मादी ७३ सेमी



## शरीर वाढ क्षमता :-

| वय | सरासरी वजन (किलो) |
|---|---|
| जन्मत: करडाचे वजन | नर – २.२३<br>मादी – २.०५ |
| ३ महिने वयाच्या करडाचे वजन | ९ ते १० किलो |
| ६ महिने वयाच्या करडाचे वजन | १४ ते १५ किलो |
| १२ महिने वयाच्या करडाचे वजन | नर – २५ किलो<br>मादी – २१ किलो |
| पूर्ण वाढ झालेल्या शेळीचे वजन | बोकड – ५०<br>मादी – ३२ |

## प्रजनन क्षमता :-

| | |
|---|---|
| प्रथम माजावर येण्याचे वय | ८ ते ९ महिने |
| प्रथम गर्भधारण वेळेचे वय | १० ते ११ महिने |
| प्रथम विताचे वय | १६ ते १८ महिने |
| दोन वितातील अंतर | ७ ते ८ महिने |
| गाभण काळ | ५ महिने |
| प्रथम वेताचे वेळी वजन | २४.५० किलो |
| माजाचा कालावधी | ३४ ते ३६ तास |
| जुळ्या करडाचे प्रमाणे | ४० टक्के |

**मासोत्पादन क्षमता :-** एक ते दिड वर्षे वयाच्या बोकडाच्या मटणाचा उतारा ५३ टक्के एवढा आहे.

**दुधउत्पादन क्षमता :-** ६०० मिली प्रतीदिन दुध उत्पादन, दुधाचा कालावधी ९७ दिवस

## किफायतशीर शेळीपालन तंत्रज्ञान

शेळीपालन व्यवसाय हा ठाणबंद पध्दतीने असो वा पारंपारीक पध्दतीने असो काही प्रमाणके ठरलेली आहेत. ज्याच्या आधारावर त्यास आदर्श शेळीपालन म्हणता येईल. आदर्श शेळीपालनाचा ज्या वेळेस विचार केला जातो त्यावेळेस प्रामुख्याने दोन गोष्टीचा समावेश करण्यात येतो एक म्हणजे आदर्श जातीवंत शेळी आणि आदर्श संगोपन व्यवस्थापन.

## गोठा व्यवस्थापन :-

गोठ्याची रचना पूर्व पश्चिम असावी. गोठ्यातील जमिन मुरमाड व उंचवट्याची असावी, कोकणासारख्या अति पर्जन्यमान भागात जमिनीत ओलावा असल्यामुळे शेळ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने त्यांना बसण्यासाठी गोठ्यात जमिनीपासून दोन ते अडीच फुट अंतरावर बांबूची मचाण करावी. शेळीच्या पायाखाली बांबूचे अर्धे कापलेले तुकडे एकमेकापासून अर्धा इंच अंतरावर ठेवावेत म्हणजे शेळ्यांचे मलमुत्र या फटीतून जमिनीवर पडेल, त्यामुळे ओलावा राहणार नाही व मलमुत्राच्या अतिशय उग्र वासाचा त्रास होणार नाही.





गोठ्याचे छप्पर हे सहजरित्या उपलब्ध लाकडी बल्या, बांबू, गवत, पाचट, भाताचा पेंढा इ. साधन सामुग्रीचा वापर करुन तयार करावे, छत माफक उतरते असावे, गोठ्याच्या आजूबाजूला मोकळी जागा असावी जेणेकरुन गोठ्यात हवा खेळती राहील. गोठ्यामध्ये वैरण खाद्य आणि पाणी देण्याची व्यवस्था करावी. तसेच गोठ्या भोवती कुंपण असावे, आजूबाजूला शिवण, खैर, उंबर, सुभाबूळ, आपटा, गिरीपुष्प इ. अशा प्रकारची झाडे झुडपे लावावीत. जेणेकरुन शेळीला वेळच्या वेळी आवश्यक त्या पध्दतीने झाडपाला खाद्य म्हणून देणे सोयीचे होईल. प्रती शेळी गोठ्यातील जागा १०-१२ चौ. फुट छप्परयुक्त व २०-३० चौ. फिरण्यासाठी असावी. ऋतुमानानुसार शेळ्यांच्या गोठ्यात योग्य तो बदल करावा.

## शेळ्यांचे आहार व्यवस्थापन :-



शेळ्यांना त्यांच्या वयानुसार व त्यांच्या शारीरिक परिस्थितीनुसार पौष्टीक घटक द्रव्य असलेला चांगल्या प्रतीचा खुराक व चारा द्यावा. शेळ्यांना त्यांच्या वजनाच्या ३-४ टक्के एवढा सुका भाग खाद्यातून द्यावा. दिवसाकाठी ३ ते ४ किलो हिरवा चारा जसे झाडपाला, लसून घास, बरसीम, मका इ. व १ ते दिड किलो वाळलेली वैरण द्यावी. यामध्ये ज्वारीचा कडबा, तुरभुसा, भुईमूगाचा पाला, कुळीथ भुसा इ. चा समावेश करावा. शेळ्या चराऊ असतील तर किमान ८ ते १० तास भरपूर चरण्यास सोडाव्यात. जास्त तापमानाच्या दिवसात सकाळी व संध्याकाळी शेळ्या चरु द्याव्यात. शेळ्यांना गुटगुटीत व वजनदार करडे मिळण्यासाठी गाभण काळात शेवटच्या ६ ते ८ आठवड्यात चांगल्या वैरणी बरोबर ४०० ते ५०० ग्रॅम (अंबोण) खुराक देणे गरजेचे आहे. याशिवाय कॅल्शिअम, फॉस्फरस, मीठ असलेले मिश्रण चाटण्यास ठेवावे. विण्यापूर्वी ४ ते ५ दिवस अगोदर ५० टक्के खुराक मिश्रण कमी करुन त्याऐवजी गव्हाचा कोंडा तितकाच टाकावा.



## करडाचे संगोपन व्यवस्थापन :-



करडे जन्मल्यावर त्यांना लवकरात लवकर म्हणजेच एक ताच्या आत मातेचा चिक पाजावा. मातेचा चिक पाजणे अत्यंत आवश्यक असून ही क्रिया तीन दिवस सतत करावी. करडांना त्यांच्या वजनाच्या १० टक्के दूध दिवसातून दोनदा विभागून पाजावे, नवजात करडांची बेंबीपासून दोन ते अडीच इंचावर नाळ कापावी. नाळ कापण्यासाठी स्वच्छ निर्जंतुक केलेली कात्री वापरावी किंवा नवीन ब्लेड वापरावे. त्यानंतर आयोडिनमध्ये भिजवलेल्या दोऱ्याने नाळ बांधावी. करडे १० ते १२ दिवसांचे झाल्यावर त्यांना हिरवा एकदल व द्विदल प्रकारचा चारा थोडा सुकवून व कोरडा द्यावा व दुधाचे प्रमाण हळूहळू कमी करावे. करडे तीन महिन्याची झाल्यावर मातेपासून दूर करावीत. करडाच्या निकोप वाढीसाठी तीन महिन्यानंतर पशुवैद्यकांच्या सल्ल्याने औषध उपचार करावा व जंतनाशक औषधे पाजावीत. मांसासाठी ठेवलेल्या करडांना वैरणीशिवाय १५० ते २०० ग्रॅम खुराक द्यावा.

## पैदाशीच्या बोकडांचे संगोपन, व्यवस्थापन :-



पैदाशी बोकडास कळपाचा राजा संबोधले जाते. पैदाशीचा नर निवडताना तो शक्यतो जातीवंत असून जुळ्यातील जन्मलेला व जन्मत: वजन जास्त असलेला निवडावा, नर दिसायला चपळ ऐटदार बांधेसुद असावा त्याचे अंडकोषात दोन्ही वृषणे असावीत. पैदाशीच्या काळात वैरणीशिवाय बोकडाला ४०० ते ८०० ग्रॅम पर्यंत वजनानुसार खुराक द्यावा, पैदाशीच्या बोकडास सतत शेळ्यामध्ये ठेवू नये. दर २ वर्षांनी बोकडाची अदलाबदल करावी. प्रत्येक २५ ते ३० शेळ्यांसाठी कळपात एक बोकड ठेवावा.

## शेळ्यांचे आरोग्य व्यवस्थापन :-

शेळ्यांना विविध रोगापासून मुक्तीसाठी उपलब्धतेनुसार नियमित लसीकरण करुन द्यावे व आंतर परोपजीव व बाह्य परोपजीवापासून संरक्षणासाठी पशुवैद्यकाच्या सल्ल्याने खालीलप्रमाणे जंतूनाशक औषधांचा वापर करावा.

## जंतनाशक कार्यक्रम :-

| अ. क्र. | जंताचे नाव | जंतनाशकाचे नाव | महिना |
|---|---|---|---|
| १ | टेपवर्म (फितीसारखे कृमी) | फेनबेंडाझॉल, १% मोरचुदाचे द्रावण | जानेवारी व जून |
| २ | गोलकृमी | अलबेंन्डाझॉल | मार्च व जुलै |
| ३ | चपटे कृमी | डिस्टोथ्रीन | मे व ऑक्टोबर |

तसेच शेळीला ठराविक कालावधीत पुढीलप्रमाणे लसीकरण करणे आवश्यक आहे.

## लसीकरणाचा वार्षिक कार्यक्रम

| अ. क्र. | रोग | महिना | मात्रा शेळी | मात्रा करडे (६ महिने वयानंतर) |
|---|---|---|---|---|
| १ | फुफसदाह | जानेवारी | २ मिली कातडी खाली | २ मिली कातडी खाली |
| २ | घटसर्प | मार्च–सप्टेंबर | ५ मिली कातडी खाली | २.५ मिली कातडी खाली |
| ३ | देवी | एप्रिल | कातडीवर (कानाचे टोक / शेपटी खाली) | कातडीवर (कानाचे टोक /शेपटी) खाली) |
| ४ | आंत्रविषार | मे–नोव्हेंबर | ५ मिली कातडी खाली | २.५ मिली कातडी खाली |
| ५ | बुळकांडी | जून | १ मिली कातडी खाली | १ मिली कातडी खाली |
| ६ | फऱ्या | जुलै | ५ मिली कातडी खाली | २.५ मिली कातडी खाली |
| ७ | पायलाग / लाळ्या खुरकत | ऑगस्ट | ५ मिली कातडी खाली | ५मिली कातडी खाली |
| ८ | पी. पी. आर | फेब्रुवारी (दर २ वर्षांनी) | १ मिली कातडी खाली | १ मिली कातडी खाली |

अशाप्रकारे शेतकरी, युवक महिलांनी पुढाकार घेऊन या व्यवसायाकडे व्यावसायिक दृष्ट्या बघणे काळाची गरज असून लागणारे सर्व तांत्रिक मार्गदर्शन कृषि विज्ञान केंद्र, किल्ला–रोहा यांचे मार्फत मिळू शकेल.





